N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर  **P.S.(ठाणे):** राजारामपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0141  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/03/2023 10:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार  **Date From (दिनांक पासून):** 11/03/2023

**Time Period (कालावधी):** पहर 1  **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/03/2023

**Time From (वेळेपासून):** 01:03 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 01:03 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 11/03/2023  **Time (वेळ):** 10:40 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/03/2023 10:40 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** एनसीसी भवन चौकात,सिग्नल जवळ कोल्हापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सागर अशोक कांबळे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मराठी शाळे जवळ ,पाडळी खुर्द ,जिकोल्हापुर,ताकरवीर,करवीर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मराठी शाळे जवळ ,पाडळी खुर्द ,जिकोल्हापुर,ताकरवीर,करवीर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नागेश सिध्दाराम मात्रे सहा.पोलीस निरीक्षक | | | 1. जुना राजवाडा पोलीस ठाणे,, जुना राजवाडा,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | रुपेश तुकाराम कुंभार पो.हवा.ब.नं.523 | | | 1. जुना राजवाडा पोलीस ठाणे,जुना राजवाडा,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

वर्दी जबाब दि.11.03.2023
मी सागर अशोक कांबळे, वय 40 वर्ष, व्यवसाय:- शेती व नेटवर्क मार्केटींग, रा. मराठी शाळे जवळ, पाडळी खुर्द, ता. करवीर, जि. कोल्हापुर. मो.नं. 9922929217.
मी वरील प्रमाणे असुन मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहणेस आहे. मी ब्लॉक ऑरा या कंपनीमध्ये गुंतवणुकदार व डिस्ट्रीब्युटर म्हणुन सन 2022 पासुन कार्यरत आहे. माझे खाली चेन पद्धतीने 50 ते 60 डिस्ट्रीब्युटर जॉईन आहेत. त्यापैकी अमोल विलासराव मोहीरे हे सुद्धा गुंतवणुकदार व डिस्ट्रीब्युटर म्हणुन जॉईन आहेत.
माझे आत्तीचा मुलगा अमोल विलासराव मोहीरे यांचे टिममध्ये कार्यरत असलेले श्री योगेश मांडरेकर, रा. रंकाळा टॉवर कोल्हापुर यांनी ब्लॉक ऑरा या कंपनीमध्ये पाच लाख वीस हजार रुपये गुंतविले आहेत. काही कौटुंबिक कारणास्तव गुतवणुक केलेली रक्कम परत मिळणेकरीता अमोल मोहीरे याचे विरुद्ध फसवणुक केले बाबत तक्रारीअर्ज केलेला आहे. सदर अर्जाची चौकशी जुना राजवाडा पोलीस ठाणे कोल्हापुर येथील सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांचेकडे आहे. सदर अर्जाचे अनुषंगाने फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारी अर्जातील तक्रारदार श्री योगेश मांडरेकर यांना सांगुन तक्रार मागे घेण्यासाठी सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांनी माझ्याकडे 8,00,000/- रुपये लाचेची मागणी केलेली असल्या बाबतची तक्रार सांगुन वर नमुद मजकुरची हस्तलिखीत सविस्तर तक्रारी अर्ज दि.10.03.2023 रोजी संदीप पाटील साहेबांचेकडे दिला होता.
त्यानंतर पाटील साहेबंानी मला त्यांचे सोबतचे दोन सरकारी पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. पाटील साहेबांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली.
त्यानंतर पाटील साहेबांनी मी सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांचे विरुद्ध दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने दि.10.03.2023 रोजी पंचा समक्ष केले पडताळणी कारवाईमध्ये सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे यांनी माझ्या आत्तीचा मुलगा अमोल मोहीरे याचे विरुद्ध आलेल्या तक्रारी अर्जावरुन फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारी अर्जातील तक्रारदार योगेश मांडरेकर यांना सांगुन तक्रारी अर्ज मागे घेण्यासाठी माझ्याकडे 8,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन 8,00,000/- रुपये लाच रक्कम लागलीच घेऊन येण्यास सांगीतल्याचे व मी लाच रक्कम सहा. पोलीस निरीक्षक नागेश मात्रे यांना देण्यासाठी पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांनी मला प्रोत्साहन दिले. पाटील साहेबांनी मला व पंच श्री जाधव यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण वरील प्रमाणे संभाषण झाल्याची खात्री केली.
दि.11.03.2023 रोजी सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 6,00,000/- रुपये व पाटील साहेबांनी त्यांचेकडील दोन लाख रुपयांच्या डमी नोटा वापरुन 8,00,000/- रुपये लाचेची रक्कम पुर्ण केली. सदर नोटांना अँथ्रासीन पावडर लावुन त्या नोटांचे गठ्ठे एकावर एक या पद्धतीने एका वर्तमान पत्रावर ठेऊन त्यास रब्बर लावुन माझे हुंडाई व्हेन्यु कार नं एम.एच. 09 जी.ए. 7800 मध्ये पाठीमागील सिटवर ठेवले. त्यानंतर मला दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पाटील साहेबांनी योग्य त्या सुचना दिल्या. दरम्यान मुदतीत पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांनी मला कॉल करुन कुठे आहे असे विचारुन तुम्ही कुठ आहे तिथं येतो असे सांगीतले. मी पोलीस हवालदार कुंभार यांना मगाशी थांबलो असलेल्या ठिकाणी एन.सी.सी. भवन चौक कोल्हापुर येथे पाच मिनीटात येत असल्याचे सांगीतले. सापळा कारवाई दरम्यान मी व पंच जाधव असे एन.सी.सी. भवन चौक, कोल्हापुर येथे गेल्यानंतर पोलीस हवालदार कुंभार यांना कॉल करुन कुठे

आहे विचारले असता त्यांनी "राजारामपुरीत आलो आहे" असे सांगुन कॉल कट केला. मी व पंच जाधव सदर ठिकाणी थांबुन राहीलो काही वेळात हवालदार कुंभार यांनी पुन्हा फोन करुन "मागे आलो आहे मागे या" असे सांगीतले. मी त्यांना एन.सी.सी. भवन चौकात सिग्नल जवळ थांबलो असल्याचे सांगीतले, पोलीस हवालदार कुंभार यांनी माझे कारचा नंबर विचारुन घेऊन कॉल कट केला. त्यानंतर काही वेळात एक महींद्रा व्हेरीटो कंपनीची कार नं एम.एच. 09 बी.एक्स. 3346 माझे कारचे समोर येऊन थांबली. सदर कारमधुन पोलीस हवालदार रुपेश कुंभार उतरुन माझे कार जवळ आले. मी त्यांना साहेब कुठे आहेत असे विचारले, कुंभार यांनी मात्रे साहेब गाडीत असल्याचे सांगीतले. त्यानंतर काही वेळात अमोल मोहीरे हा त्याचेकडील कारने आम्ही थांबलो असलेल्या ठिकाणी आला. मी मात्रे साहेब बसलेल्या महींद्रा व्हेरीटो गाडी जवळ गेलो. मी त्यांना बाहेर येण्या बाबत विनंती केली. त्याप्रमाणे मात्रे साहेब व्हेरीटो कारमधुन उतरुन माझे कार जवळ आले. मी कुंभार साहेब यांनाही सदर ठिकाणी येणे बाबत विनंती केली. त्याप्रमाणे मात्रे साहेब व कुंभार साहेब माझे कार जवळ आले. मी मात्रे साहेबांना कारमध्ये बसणे बाबत विनंती केली. त्याप्रमाणे मात्रे साहेब माझे कारचे ड्रायव्हर सिटचे पाठीमागील सिटवर बसले. मात्रे साहेबांनी कुंभार व पंच जाधव यांना बाहेरच थांबणे बाबत सांगीतले. त्याप्रमाणे ते दोघे बाहेर थांबुन राहीले. त्यानंतर मी मात्रे साहेबांना तुम्ही सांगीतल्याप्रमाणे आठ लाख रुपये आणले आहेत हे बघा मोजुन घ्या असे म्हणुन मी पैसे माझ्या हातात घेतले. त्यावेळी भाऊ अमोल यांने "याचं काही टेन्शन नको, खुप वाईट परस्थिती आहे, हे कसं जमवलय, प्लीज याच्यावर काय व्हायला नको" असे सांगीतले. मी मात्रे साहेबांना योगेश मांडरेकर याला बोलवुन घेणे बाबत विनंती केली. मात्रे साहेबांनी त्याचे क्लिअर करावे लागलं असे सांगीतले, भाऊ अमोल यांने कंपनीला मेल पाठवतो, मेल पाठवला की चोवीस तासाच्या आत त्यांना मिळुन जाईल असे सांगीतले. त्यानंतर मी "पैसे" असे म्हणुन माझ्या हातातील अँथ्रासीन पावडर लावुन ठेवली लाच रक्कम 8,00,000/- रुपये माझे दोन्ही हातानी मात्रे साहेबांचे समोर धरले असता मात्रे साहेबांनी 8,00,000/- रुपये त्यांचे दोन्ही हाताने पैशाचे गठ्ठे स्विकारुन मला पिशवी बाबत विचारले, त्यांना पिशवी नसल्याबाबत सांगीतले. त्यानंतर गाडीचे पाठीमागील सिटच्या पाठीमागे असलेली बॅग मात्रे साहेबांनी घेतली व त्यामध्ये पैसे ठेऊन ती बॅग पोलीस हवालदार कुंभार यांचेकडे दिली. कुंभार लाच रक्कम ठेवलेली बॅग घेऊन व्हेरीटो कारमध्ये बसले. मी व मात्रे साहेब व्हेरीटो कारकडे बोलत जात असताना मी माझे डावे हाताने माझ्या पॅन्टच्या पाठीमागील डावे बाजुच्या खिश्यातील हात रुमाल बाहेर काढुन त्यांने तोंड पुसुन लाच स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावरुन पाटील साहेब, भिलारे साहेब, पंच चौगुले व सापळा पथक असे व्हेरीटो कार जवळ आले व हवालदार कुंभार यांना व्हेरीटो कार मधुन ताब्यात घेतले. तेवढ¬ात मात्रे साहेब यांना संशय आल्याने ते पळत सुटले त्यांचे पाठोपाठ पाटील साहेबांनी व चौगुले यांनी त्यांचा पाठलाग करुन त्यास पकडुन व आम्ही थांबलेल्या ठिकाणी 01.03 वाजता घेऊन आले. त्यावेळी पोलीस हवालदार कुंभार यांच्या ताब्यात असलेली लाचेची रक्कम 8,00,000/- रुपये दोन पंचासमक्ष हस्तगत केली आहे.

सदर ठिकाणी पाटील साहेबांनी सहा.पोलीस निरीक्षक, नागेश मात्रे व पोलीस हवालदार रुपेश कुंभार यांना त्यांचे नाव गांव विचारले असता अनुक्रमे त्यांनी त्यांचे नांव 1) नागेश सिद्धाराम मात्रे वय 38 वर्षे, व्यवसाय – नोकरी सहा. पोलीस निरीक्षक, नेमणुक जुना राजवाडा पोलीस ठाणे, रा. श्रीनगर, मजरेवाडी, तालुका व जिल्हा सोलापुर सध्या पोलीस क्लब, पोलीस मुख्यालय कोल्हापुर, 2) रुपेश तुकाराम कुंभार, वय 41 वर्षे, व्यवसाय – पोलीस हवालदार ब.नं. 523 नेमणुक जुना राजवाडा पोलीस ठाणे, रा. सडोली खालसा, ता. करवीर, जि. कोल्हापुर, सद्या रा. पुईखडी प्लॉट नं 69 कलीकती नगर कोल्हापुर असे असल्याचे सांगीतले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही अॅन्टी करप्शन कार्यालय कोल्हापुर येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि.10.03.2023 रोजी लोकसेवक 1) नागेश सिद्धाराम मात्रे, सहा. पोलीस निरीक्षक, जुना राजवाडा पोलीस ठाणे यांनी माझ्याकडे माझ्या आत्तीचा मुलगा अमोल मोहीरे याचे विरुद्ध आलेला तक्रारी अर्जावरुन फसवणुकीचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारी अर्जातील तक्रारदार योगेश मांडरेकर यांना सांगुन तक्रारी अर्ज मागे घेण्यासाठी माझ्याकडे चर्चेअंती 8,00,000/- रुपये लाचेची मागणी केली व लोकसेवक 2) रुपेश तुकाराम कुंभार, पोलीस हवालदार ब.नं. 523, जुना राजवाडा पोलीस ठाणे यांनी मी लाच रक्कम मात्रे साहेबांना द्यावी याकरीता मला प्रोत्साहन दिले. तसेच सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक 1) नागेश सिद्धाराम मात्रे व लोकसेवक 2) रुपेश तुकाराम कुंभार यांनी स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून माझे भावा विरुद्ध आलेल्या तक्रारी अर्जावरुन गुन्हा दाखल न करण्यासाठी व तक्रारी अर्जातील तक्रारदार यांना सांगुन तक्रारी अर्ज मागे घेण्यासाठी एन.सी.सी. भवन चौक कोल्हापुर येथे माझ्याकडून 8,00,000/- रुपये लाच रक्कम लोकसेवक नागेश सिद्धाराम मात्रे यांनी स्वतः स्विकारुन सदर लाच रक्कम लोकसेवक रुपेश तुकाराम कुंभार यांचेकडे दिली आहे तसेच मी लाच रक्कम मात्रे साहेबाना द्यावी याकरीता पोलीस हवालदार कुंभार यांनी मला प्रोत्साहन दिले आहे, म्हणून माझी लोकसेवक 1)

नागेश सिद्धाराम मात्रे व लोकसेवक 2) रुपेश तुकाराम कुंभार यांचे विरुद्ध कायदेशीर फिर्याद आहे.
माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
BHAGVAN BAPU SHINDE
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** PCMH26300
**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**
**Name (नाव):** ANIL HARIBHAU TAN
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PCMH82181

पोलीस निरीक्षक
राजारामपुरी पोलीस ठाणे
कोल्हापूर